नि.फौ.ख.क्रं.१९/२०२२
सरकार वि. शारदा व इतर.
**नि.क्रं.४२.**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४ यांची जबानी.</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की–

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | केवळराम तुळशिराम खेकडे, |
| वय सुमारे | : | ६० वर्ष ,व्यवसाय: शेती, |
| निवासस्थान | : | भूयार, |
| तालुका | : | पवनी, जिल्हा: भंडारा. |

**<u>सरतपास – सहा. सरकारी वकील श्री. पी. एस. बुटले साहेब यांचेमार्फत</u>**–

१. घटना तीन वर्षापूर्वी दुपारी ०२.३० ते ०३.०० वाजण्याच्या दरम्यान मारोती भाकरे यांच्या घरासमारे अंगणात भूयार येथे घडली होती. त्यावेळी मी मारोती भाकरे यांच्या घराच्या अंगणात बसलो होतो व त्यांना सामानाची लिस्ट सांगत होतो. तेवढ्यात दुर्योधन बाळबुधे, अंकुश बाळबुधे, अरविंद बाळबुधे आणि बंडु बाळबुधे, शारदा, वनीता असे सात ते आठ जन हातात लाठ्या काठ्या घेवुन आले. एकदम सर्व आरोपींनी मला काठीने मारण्यास सुरूवात केली. मला डाव्या मांडीवर, डाव्या हातावर, डाव्या खांद्यावर आणि डोक्यावर मारहाण झाली होती. मला डोक्यावर मारल्यानंतर मी बेहोश झालो. त्या नंतर मला दवाखान्यात कोणी नेले हे मला माहीत नाही. मला दोन दिवसांनी जाग आली तेव्हा मी ब्रम्हपुरी येथे खाजगी दवाखान्यात भरती होतो. मला आरोपी परमेश्वर बाळबुधे यांनी देखील मारहाण केली होती.

२. आता मला मुद्देमालातील एम.पी. नंबर ०२/२३ वरील दोन काठ्या दाखविण्यात आल्या. आरोपीने मला ज्या काठीने मारहाण केली. ती काठी दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला दोन लाकडी काठ्या दाखविण्यात आल्या. त्या त्याच असुन त्यांना अनुक्रमे वस्तु क्रं.१ व २ देण्यात येते. सदर प्रकरणातील फिर्याद माझी मुलगी ज्योस्त्ना तुलाराम भोयर हिने दिली होती. ज्या आरोपीने मला मारहाण केली त्या आरोपींना मी ओळखतो. न्यायालयात हजर शारदा व अनीता यांना मी ओळखतो. तसेच दोषारोपपत्रातील इतर आरोप न ठेवलेल्या व्यक्तींना मी आरोपींना ओळखतो.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>उलट तपास आरोपीतर्फे वकील श्री. आर. बी. बावणे यांच्यामार्फत सुरू</u>**.

३. हे म्हणणे खरे आहे की, माझा व आरोपींचा रस्त्याचा वाद आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी मार्च २०२१ मध्ये आरोपींचा येण्या जाण्याचा रस्ता अडवला होता. हे म्हणणे खरे आहे की,

त्यामुळे आरोपी क्रमांक १ व २ यांचे सासरे व पती यांनी माझ्याविरूध्द दिवाणी न्यायालय, पवनी येथे दावा दाखल केला होता. हे मला माहीत नाही की, सदर दिवाणी न्यायालयात मी आरोपींचा रस्ता अडवु नये असा आदेश झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर दिवाणी न्यायालयाच्या आदेशाविरूध्द भंडारा येथे अपील केली होती. हे म्हणणे खरे आहे की, पवनी न्यायालयाच्या आदेशाविरूध्द केलेल्या जिल्हा न्यायालयातील अपीलामध्ये सदर पवनी न्यायालयाचा आदेश अद्यापपर्यंत रद्दबादल झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दिवाणी न्यायालयाचा आदेश असुनही आरोपींना जाणे येण्याच्या कारणावरून मी दारू पिवुन शिवीगाळ करीत असे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी मी दारू पिवुन आरोपी अनीताच्या घरी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी अनिताच्या घरी जावुन प्रमोदला जीवे मारणार आहे, बाहेर निघ असे म्हणत होतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रमोद हा अनीताचा पती आहे. हे मला माहीत नाही की, मी प्रमोदच्या घरी गेलो त्यावेळी प्रमोद घरी नव्हता त्याची आई मुक्ताबाई होती. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यावेळी प्रमोदच्या आईला चाकु दाखविला होता. हे मला माहीत नाही की, मी प्रमोदच्या घरी गेलो तेव्हा त्याच्या घरी अनीता व शारदा हजर नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, प्रमोदच्या घरी कोणी नव्हते त्यामुळे मी रागारागाने चौकाकडे जाण्यास निघालो, त्यावेळी मला शारदा व अनीता या कामावरून येतांना दिसल्या त्यांना मी शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, मी अनीताला म्हणालो होतो की, ''मी प्रमोदचा मर्डर करणार आहे''. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी अनिता व शारदा यांच्या अंगावमीर धावुन जात होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी दारू पिवुन असल्याने स्वत:च खाली पडल्याने मला मार लागला.

४. हे म्हणणे खरे नाही की, घटना मारोती भाकरे यांच्या घरासमोर आंगणात घडली हे मी खोटे सांगत आहे. पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे बयान नोंदविले होते. मी पोलीसांना बयान देतेवेळी घटना मारोती भाकरे यांच्या घरासमोर अंगणात घडल्याचे, तसेच त्यावेळी मी मारोती भाकरे यांच्या घराच्या अंगणात बसलो होतो व त्यांना सामानाची लिस्ट सांगत होतो असे सांगीतले होते. आता मला माझे बयान वाचुन दाखविण्यात आले. सदर बाब माझ्या बयानात नमुद नाही, ती का नमुद नाही याचे कारण मला सांगता येत नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की, दुर्योधन बाळबुधे, अंकुश बाळबुधे, अरविंद बाळबुधे आणि बंडु बाळबुधे, शारदा, वनीता असे सात ते आठ जन हातात लाठ्या काठ्या घेवुन आले. एकदम सर्व

आरोपींनी मला काठीने मारण्यास सुरूवात केली.  आरोपींनी मला काठ्याने मारहाण केल्याचे मी खोटे सांगत आहे.

६.    हे म्हणणे खरे नाही की,  मी पोलीसांना बयान देतेवेळी, अंकुश, प्रमोद, बंडु, अरविंद, सोमश्वर व दुर्योधन यांनी मला मारहाण केली नव्हती असे सांगीतले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आज सदर अंकुश, प्रमोद, बंडु, अरविंद, सोमश्वर व दुर्योधन यांना फसविण्यासाठी त्यांनी मारहाण केल्याचे सांगत आहे.

७.    मी पोलीसांना बयान देतेवेळी, आरोपींनी मला डाव्या मांडीवर, डाव्या हातावर, डाव्या खांद्यावर आणि डोक्यावर मारहाण झाली होती. मला डोक्यावर मारल्यानंतर मी बेहोश झालो असे सांगीतले होते. आता मला माझे बयान वाचुन दाखविण्यात आले. सदर बाब माझ्या बयानात नमुद नाही, ती पोलीसांनी का नमुद केली नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

८.    हे म्हणणे खरे नाही की, आरोपींचा व माझा रस्त्याचा वाद असल्याने मी त्यांचा वचका काढण्यासाठी आरोपींविरूध्द खोटी फिर्याद दिली आहे.  हे म्हणणे खरे नाही की, मला कोर्टातुन रस्ता मिळाली नाही त्यामुळे आरोपींना फसविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मारहाण केली नसतांनाही मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वस्तु क्रं.१ व २ या वस्तुनी मला मारहाण झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**
**<u>फेरतपास – काही नाही</u>.**

समक्ष

स्वा/–
(एस. एन. पाटील)
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., पवनी.
०७/०२/२०२४

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/–
(एस. एन. पाटील)
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., पवनी.
०७/०२/२०२४